क्रमांक : १५९८ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : २२ जानेवारी, २०२०

**:: प रि प त्र क ::**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या कामकाजाचे स्वरुप पाहता अधिवेशन कालावधीत बहुतेक कक्षांतील कामाचे प्रमाण अनेक पटीने वाढलेले असते तसेच अधिवेशनासंदर्भातील कामास अत्यंत तातडी असते. असे असतांना या सचिवालयातील अनेक अधिकारी / कर्मचारी अधिवेशन कालावधीत दीर्घ रजेवर असल्याचे व अधिवेशन कालावधीत रजा घेण्याचे प्रमाण वाढले असल्याचे निदर्शनास आले आहे.

वास्तविक, अर्जित रजेवर जाताना अधिकारी / कर्मचाऱ्यांनी कमीत कमी १५ दिवस अगोदर संबंधित अधिकाऱ्यांची त्या अर्जावर रितसर शिफारस घेऊन आस्थापना कक्षास सादर करणे आवश्यक आहे. **महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम १० (१) नुसार रजा म्हणजे सक्षम प्राधिकाऱ्याने स्वेच्छानिर्णयानुसार कामावर अनुपस्थित राहण्यास दिलेली परवानगी.** त्यामुळे अधिकारी / कर्मचारी यांच्या रजेस मान्यता देणाऱ्या त्यांच्या अधिकाऱ्यांची देखील यासंदर्भात जबाबदारी येते. **नियम १० (२) नुसार हक्क म्हणून रजा मागता येत नाही.** त्यामुळे एखाद्या कर्मचाऱ्यांच्या नावे रजा शिल्लक आहे म्हणून त्याने रजेची मागणी करणे वा त्यांची मागणी मान्य करुन त्याच्या जागेवर बदली कर्मचाऱ्याची मागणी करणे अयोग्य आहे. तसेच रजा मंजूर केल्याने कार्यालयीन कामकाजाची गैरसोय होणार नाही. याबाबतची शक्यता विचारात घेऊन अधिकाऱ्यांनी रजेच्या मान्यतेबाबत निर्णय घेणे अपेक्षित आहे.

अत: यापुढे अधिवेशन कालावधीत अत्यावश्यक कारणाशिवाय अधिकारी / कर्मचारी यांनी रजा घेतल्याचे आढळल्यास संबंधितांवर शिस्तभंग विषयक कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. तसेच अधिकाऱ्यांनी देखील रजेच्या कारणाची शहानिशा करुन, रजेची तातडी व आवश्यकता तसेच संबंधितांची वारंवार रजा घेण्याची प्रवृत्ती आहे किंवा कसे ? याबाबी विचारात घेऊनच प्रकरण परत्वे रजा मंजूर करावी.

**(ऋतुराज ज.कुडतरकर)**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी.